Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# ग्रामीण समाजातील शाश्वत विकास: एक अध्ययन

प्रा. डॉ. डी. के. कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर.

प्रस्तावना :

भारतातील सर्वाधिक लोकसंख्या खेड्यात राहत असल्यामुळे खेड्यांच्या विकासावरच भारताचा विकास अवलंबून आहे.'विकास' संकल्पनेला न्याय देण्यासाठी जगात विविध देशातील अनेक विचारवंतांनी विकासाचे प्रतिमान निर्माण करून नच मानव जातीच्या विकासात योगदान दिलेले आहे. भारतीय ग्रामीण समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी भारतात इ.सन.1952 पासून सामुदायिक विकास योजनेचा प्रारंभ झाला. स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ग्रामीण समाजाच्या विकासासाठी वीस कलमी कार्यक्रम राबवला त्या 20 कलमी कार्यक्रमातीलही गरीबी हटाव चा नारा इंदिरा गांधींनी दिला होता, परंतु आजही ग्रामीण विकासात आर्थिक शैक्षणिक सामाजिक राजकीय व धार्मिक स्वरूपाची अडथळे दिसून येतात. या अडथल्यामुळे विविध स्वरूपाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. बेकारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, रोजगार देण्यास असमर्थ शिक्षण व्यवस्था, भेदभाव पूर्ण संकुचित विचार, स्वतःचा विकास करण्याच्या मानसिकतेचा व कृतीशीलतेचा अभाव, सत्ता स्थानी स्वार्थी व भ्रष्ट लोकांचा अधिक भरणा, तसेच धर्माच्या नावावर अनिष्ट रूढी व प्रथांचा अतिरेक दिवसे दिवस वाढत

आहे. या प्रकारामुळे ग्रामीण भागातील लोकांचे आर्थिक शैक्षणिक सामाजिक राजकीय व धार्मिक स्वरूपाची शोषण होत आहे. त्यांच्यात गुलामगिरीची मानसिकता निर्माण होत आहे. म्हणूनच या प्रकारांना रोखण्यासाठी विकासा  प्रक्रिया गतिमान करणे आवश्यक आहे. आज भारतात नवी जगात शाश्वत विकासाची प्रक्रिया गतिमान झाली असतानाच भारतीय ग्रामीण समाजातील शाश्वत विकास हे अध्ययन करणे अतिशय महत्त्वाचे वाटते. विकास आणि शाश्वत विकास या दोन्हीही संकल्पना समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. 'विकास' या संकल्पनेला समानार्थी म्हणून 'प्रगती' वा 'वाढ' हे शब्द वापरतात, परंतु हे पूर्ण सत्य नाही राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाल्यास त्यास वाढ किंवा प्रगती म्हणता येईल, परंतु फक्त राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली म्हणजे राष्ट्राचा विकास होतो असे नाही, कारण अनेक देशात खनिज तेलामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडली तरी पण त्याची देशाचा विकास झाला नाही. जोपर्यंत "जनकल्याण" ही विकासाचे लक्ष साध्य होत नाही तोपर्यंत कोणतेही विकास देशाचा विकास होऊ शकत नाही. डॉ. वसंत यांच्या मते,"भारतातील संपूर्ण खेड्यात राहणाऱ्या लोकांची जीवनमान उंचावण्यासाठी होणाऱ्या जाणीवपूर्वक प्रयत्नांची पराकाष्ठा करणे म्हणजे 'ग्रामीण विकास'होय.", म्हणजेच विकास या संकल्पनेचा शाश्वत विकासाची मूळ पुरवलेले दिसून येते, ग्रामीण लोकांची जीवनमान उंचावण्यासाठी फक्त आर्थिक विकासात नाही तर सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व पर्यावरण विषयक विकास अभिप्रेत होता. ग्रामीण व्यवस्था परिवर्तनासाठी ग्रामीण उज्वल भविष्याच्या उभारणीसाठी लोकांचा जाणीवपूर्वक सहभाग

महत्त्वाचा वाटतो. हा संपूर्ण लोकांचा सहभाग उच्च उत्पादन प्राप्त करण्यासाठी समान वितरणासाठी आणि ग्राहक उत्पादकांना जास्तीत जास्त सुख मिळवण्याच्या कामी तसेच रोगमुक्त पर्यावरण निर्माण करण्यासाठी असावा असे वाटते. तर ग्रामीण समुदायाची आर्थिक उत्क्रांती स्थानिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीवर आधारित असावी त्यामुळे निव्वळ नफा वाढवून ग्रामीण गरिबी कमी करण्यास मदत होईल.कार टेलर यांच्या मते,"सामुदायिक विकास ही अशी पद्धत आहे की, जी मध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक व सामाजिक प्रसिद्ध धारावी म्हणून एकमेकांना मदत करण्यासाठी सहभागी होतात. त्या योग्य ती आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात कार्य करणारी प्रभावी समूह बनतात" म्हणून सामुदायिक विकास ही एक पद्धत व प्रक्रिया असून लोक स्वतःची परिस्थिती सुधारावी म्हणून सुधारणा प्रक्रियेत सहभाग नोंदवतात म्हणून सामुदायिक विकास ही एक चळवळ सुद्धा असल्याचे स्पष्ट होते. आज शाश्वत विकासाची जी संकल्पना 1997 पासून सुरुवात झाली यामुळे ग्रामीण भागातील वास्तव काय आहे हे अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे:

१) विकास या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) शाश्वत विकास या संकल्पनेचा अभ्यास करणे.

३) शाश्वत विकासाची ध्येय आणि ग्रामीण समाजातील वास्तवता अभ्यासणे.

तथ्य संकलन:

प्रस्तुत शोधनिबंधाच्या संकलनासाठी साठी प्राथमिक व द्वितीय तंत्राचा उपयोग केला आहे. प्राथमिक ते संकलनात मुलाखत निरीक्षण या तंत्राचा तर द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करताना अध्ययन विषयी संबंधित पुस्तके ,ग्रंथ, अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, कार्यशाळा चर्चासत्र ,इंटरनेट इत्यादी माहितीचा आधार घेतला आहे अध्ययनात अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे.

तथ्य विश्लेषण:

आदिवासी ग्रामीण व नागरी या तीन मिळून भारतीय समाज एक वैशिष्ट्यपूर्ण बनला आहे. प्रत्येक समाजाच्या राहणीमान; समस्या हे वेगवेगळ्या आहेत, प्रत्येक समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या योजनांचा वापर आज पर्यंत केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी केलेला दिसून येतो. विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आज पर्यंत ग्रामीण विकास ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची राहणीमान सुधारणे ही ग्रामीण विकासाचे ध्येय आहे. ही ध्येय केवळ गरिबी निर्मूलन करूनच साध्य करता येते म्हणूनच ग्रामीण विकास कार्यक्रमाने प्रामुख्याने गरीबी निर्मूलनाच्या उपाय योजनेवर लक्ष केंद्रित केलेले दिसून येते. ग्रामीण विकास कार्यक्रमा मध्ये गावकऱ्यांना विशेष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, बँकांकडून कर्ज देणे अथवा आर्थिक मदत करणे, जमीन सुधारणा, गावकऱ्यांसाठी घरबांधणी,(निवास व्यवस्था,) पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे

यांचा समावेश केला. गावामध्ये राहणाऱ्या गरीब लोकांची जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांना विकास प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक धोरणे राबविले आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत विविध विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली त्यातून काही प्रमाणात यश अपयश आल्याचे दिसून येते.

विकासाच्या नावाखाली आज भारतातून जवळपास दरवर्षी दहा लाख हेक्टर जंगल नष्ट होत असते. नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास जंगलतोडीमुळे असंख्य महापुराला आमंत्रण मिळाले. हिमालयातील बर्फ वितळल्यामुळे उत्तर भारतातील नद्यांना महापूर वाढले पर्यावरण विनाशा मुळे सुमारे दरवर्षी 50 हजार कोटीचा हानी होते. भारतातील दिल्ली हे सर्वात प्रदूषित शहर असून महाराष्ट्रात चंद्रपूर पुण्याचा नंबर लागतो केंद्र सरकारने 124 प्रदूषित शहराची नावे जाहीर केली विकासाच्या प्रक्रियेच्या नावाखाली प्रदूषणाचा सीमा ओलांडली त्यामुळे शाश्वत विकासाच्या संकल्पनेला चालना मिळाली. पर्यावरण जाणीव जागृतीसाठी प्रयत्न करणे आज संयुक्त राष्ट्र संघाचे एक प्रमुख कार्य बनले आहे. शाश्वत विकासाला चालना देण्याच्या आज अनेक देश संघटना या प्रभावीपणे सहभागी झाल्या. Green peace, society, Friend's of Earth,  world wild fund इत्यादी. त्यानंतर भारतात पर्यावरण विषयक जाणीव जागृती व्हावी हा उदात्त हेतू ठेवून अनेक मोहिमा सुरुवात झाल्या आणि शाश्वत विकासाला चालना मिळाली व शाश्वत विकासाची संकल्पना पुढे आली. शाश्वत विकासाची संकल्पना1970 च्या

दशकात सुरुवातीपासून शोधला जाऊ शकते अन्सर्स्ट ब्रासलर यांनी लिहिलेले 1972 चे जर्मन पुस्तक भविष्यातील लाकूड उत्पादनासाठी जंगलाचे जतन करण्याची दीर्घकाळापासून स्वीकारलेली शाश्वतता संकल्पना भविष्यातील पिढींसाठी जग टिकून ठेवण्यासाठी पर्यावरणीय संसाधनाचे जतन करण्याच्या व्यापक महत्वाकडे थेट हस्तांतरित केली जाऊ शकते. शाश्वत विकासाची संकल्पना इसवी सन 1987 मध्ये ब्रुडलैंड अहवालानी शाश्वत विकासाची संकल्पना अधिक स्पष्ट केली तेव्हापासून ही संकल्पना ओळखण्यास चांगल्या प्रकारे मदत झाली. शाश्वत विकास या संकल्पने समकालीन म्हणजे सध्याच्या पाढ्यांचा आणि भविष्यकालीन पीढ्यां चा या दोघांचाही विचार करण्यात आला आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांच्या गरजांशी तडजोड न करता वर्तमानपिढ्याच्या गरजा पूर्ण करतो. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो शाश्वत (कायम टिकणारा) आहे. यात आज आणि उद्याच्या पिढीचा सुखी राहतील याचा विचार करण्यात आला आहे. शाश्वत विकास पर्यावरण, समाज, आणि अर्थव्यवस्था या तीन घटकांच्या प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या समतेला बाधा पोहोचू न देता वर्तमान काळातील गरजा पूर्ण करण्याच्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात. शाश्वत विकासात नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे, पर्यावरणाची संरक्षण करणे, आणि सामाजिक न्याय व आर्थिक समानता साधने या गोष्टीचा समावेश होतो.

शाश्वत विकासाची ध्येय:

1) दरिद्र्य निर्मूलन, 2) उपासमार निर्मूलन, 3) गुणवत्तापूर्ण आरोग्य, 4) गुणवत्तापूर्ण शिक्षण, 5) लैंगिक समानता, 6) शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता , 7) नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा, 8) चांगल्या नोकऱ्या आणि अर्थसहाय्य, 9) नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा, 10) असमानता कमी करणे , 11) शाश्वत शहरे आणि समाज, 12) उपलब्ध साधनांचा जबाबदारी पूर्वक वापर, 13) हवामान क्रिया हवामानातील बदल व यांचे दुष्परिणाम यांचा सामना करण्यासाठी तात्काळ कृती करणे, 14) शाश्वत महासागर, 15) जमिनीचा शाश्वत उपयोग, 16) शांतता आणि न्याय, 17) शाश्वत विकासासाठी भागीदारी.

शाश्वत विकासाची या संकल्पनेत 17 ध्येय आहेत. त्यातील एक ते सहा पर्यंत ची ध्येय अतिशय महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. शाश्वत विकासाची सुरुवात भारतात 2015 ते 2030 पर्यंत कालावधी आहे. शाश्वत विकासाच्या संकल्पनेने अंमलबजावणीला दहा वर्षे पूर्ण झाले, परंतु आजही ध्येयापर्यंत आपण पोहोचू शकलो नाही, प्रत्यक्ष शाश्वत विकासाची ध्येय एकमेकांवर अवलंबून आहेत. दारिद्र्य निर्मूलन झाले की उपासमारीचे उच्चाटन आपोआपच होते. उपासमार  नष्ट नष्ट झाली की, आरोग्य सुधारतेः परंतु प्रस्तुत शोध निबंधात प्रत्येक ध्येय सविस्तर अभ्यास करणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मुलाखत आणि निरीक्षण तंत्राचा वापर करून स्वच्छ पाणी व स्वच्छता सर्वांसाठी पाणी व स्वच्छता याची उपलब्धता व शाश्वत व्यवस्थापन यांची सुनिश्चिती करणे. ग्रामीण समाजातील लोकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा

उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेचे अध्ययन केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1951 मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनातून गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्यासाठी लक्ष केंद्रित केले. 1972 -73 मध्ये पाणी पुरवठा योजना सुरुवात केली. काही कारणास्तव 1974 -75 मध्ये पाणीपुरवठा योजना बंद केली पुन्हा 1977-78 पासून पाणीपुरवठा योजना सुरू केली गावात आज पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली नसल्याचे दिसून येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये राष्ट्रीय जलजीवन मिशन (JJM) योजनेची तरतुद केली तर, 15 ऑगस्ट 2019 पासूनच सुरुवात केली. या योजनेचा प्रमुख उद्देश असा होता की भारतातील प्रत्येक गावातील प्रत्येक घरापर्यंत 2024 पर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करणे. गावातील प्रत्येक व्यक्तीला 55 लीटर पाणी उपलब्ध करून देणे. यामुळे ग्रामीण भागातील महिलांचा वेळ, आरोग्य, स्वच्छता यामध्ये सुधारणा करणे. ही योजना राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या सहभागातून राबवली जाते.

प्रत्यक्ष दहा गावात राष्ट्रीय जलजीवन मिशन या योजनेचा अध्ययन केले असता कोणत्याही गावात ही योजना पूर्णत्वास गेली नाही. गावात कुठे अर्धवट टाकीचे काम, तर कुठे पाईपलाईन अर्धवट, नळ जोडणीचे अर्धवट काम, असल्याचे दिसून आले. काही गावात स्थानिक स्वराज्य संस्थेतील वाद यामुळे ही मजूर होऊन बंद असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय जलजीवन मिशन ही योजना काही गावात फक्त राजकीय पुढाऱ्यांचे भक्ष बनवण्याचे दिसून येते. राजकीय पुढाऱ्यांनी या योजनेची फक्त काही ठिकाणी फक्त योजना कागदोपत्री दाखवून

अर्धवट कामे ठेवून बिल उचलून घेण्याचे काम केले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील म्हणजे गावातील रस्ते पूर्ण उखडून टाकले आहेत. त्यामुळे शाश्वत विकासाचे उद्दिष्टे पूर्ण करून. लोकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी प्रत्येक योजनेत लोकांचा सहभाग वाढवला पाहिजे परंतु तसे होताना दिसून येत नाही. कोणतीही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आणि विकास पूर्ण करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायतची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. ग्रामपंचायत ने या योजनेची अंमलबजावणीसाठी ग्रामसभेचे आयोजन आहे. परंतु प्रत्यक्ष ग्रामसभा होत नाहीत हे स्पष्ट दिसून येते. शाश्वत विकास या संकल्पनेतील स्वच्छ पाणी clean water सर्वांसाठी उपलब्ध झालेली नाही ही वास्तवता आहे. खेडेगावातील जल जीवन मिशन ही योजना फक्त आमदार, सरपंच, ग्रामसेवक, आणि गुत्तेदार यांच्या उत्पादनाचे स्त्रोत बनले आहे हे वास्तव आहे. यामुळे यावरून हे स्पष्ट दिसून येते की, शाश्वत विकासाची संकल्पना ग्रामीण समाजापासून कुसोदूरवर असल्याचे दिसून येते.

संदर्भ:

१) डॉ. राजेंद्र कुमार शर्मा, अटलांटिका पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स दिल्ली.

२) डॉ. सुरेश फुले पर्यावरण अभ्यास विद्याभारती प्रकाशन लातूर.

३) Desai Vasant Rural development (vol.||) Himalaya publication House Bombay.

४) प्रत्यक्ष निरीक्षण